**<u>मसुदा मान्यतेसाठी</u>**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय शिर्डी करीता

**विषय - श्री साईबाबा संस्थानची शववाहिका उपलब्ध नसलेल्या काळात श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील मयत झालेले रुग्णांना घरी पोहचविणेसाठी डिझेल शववाहिकेच्या सेवेबाबत ...**

श्री साईबाबा संस्थान रुग्णालयात मयत झालेल्या रुग्णांना सोडविणेकामी श्री साईबाबा संस्थानचे शववाहिका उपलब्ध नसतात. सदर काळात मयत रुग्णांना सोडविणेकामी डिझेल शववाहिकेची सेवा घेणेसाठी कोटेशन मागविणेत येत आहे.

तरी इच्छुक डिझेल शववाहिका धारकांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, ता- राहाता जि-अहमदनगर. या पत्त्यावर दि.२९/११/२०१८ अखेर खालील अटी व नियम यांचे अधिन राहुन बंद पाकिटात दरपत्रक प्रति किमी. प्रमाणे खालील तक्त्यात नमुद केले प्रमाणे देण्याचे करावे, उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच ते स्विकारणेत येणार नाही.

| अ.नं. | डिझेल शववाहिका धारकाचे नाव , | पत्ता | वाहनाचे नाव , क्रमांक | दर प्रति कि.मी. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**अटी व शर्ती,**

१. सदर शववाहिकेमध्ये फ्रिझर सह इतर अद्यावत सुविधा उपलब्ध असाव्यात .
२. सदर शववाहिका राज्यात किंवा दुसरे राज्यात जाणार असल्याने सदर वाहनांची शववाहिका म्हणुन नोंद असावी.
३. सदर शववाहिकेची फक्त सेवा घेतली जाणार आहे त्यामुळे शववाहिकेसाठी येणारा सर्व समावेशक खर्च (ड्रायव्हर ,टोल , इतर ) शव वाहिकाधारक यांना स्वत:हा करावा लागेल.
४. श्री साईबाबा संस्थानची शववाहिका उपलब्ध असेल तर शववाहिकेची सेवा घेणेबाबत आग्रह करता येणार नाही.
५. श्री साईबाबा हॉस्पिटलचे वरिष्ट अधिकारी यांनी मोफत सेवा देणेबाबत सुचना केलेल्या असतील त्यासाठी होणारा चार्ज श्री साईबाबा संस्थान आपणास देईल. परंतु त्या व्यतिरीक्त शववाहिका सेवेसाठी ठरविलेप्रमाणे होणारी रक्कम शववाहिकाधारक यांना ठरलेल्या दराप्रमाणे नातेवाईकांकडुन घ्यावी लागेल.
६. श्री साईबाबा संस्थानने मंजुर केलेल्या दराप्रमाणेच रक्कम रुग्णांचे नातेवाईक यांचे कडुन आकारावी लागेल त्यापेक्षा जास्त रक्कम किंवा भत्ता आकारता येणार नाही.
७. श्री साईबाबा संस्थानचे हॉस्पिटलचे अधिकृत विभागाने सुचविलेनंतरच श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील मयत रुग्णांना नेणेकरीता शववाहिकेची सेवा देता येईल.
८. कोणतीही पुर्व सुचना न देता सेवा बंद करण्याचा अधिकार श्री साईबाबा संस्थानने राखुन ठेवला आहे.

(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से)

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**